Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18852161

# सोशल मीडिया आणि सायबर सुरक्षेचा समाज जीवनावर होणार परिणाम

**प्रो. डॉ. सुनंदा एकनाथराव आहेर**[1]

**प्रस्तावना :**

अभासी जगातील मैत्री, सोशल मीडियावर आपल्या वैयक्तिक आयुष्यातील प्रत्येक गोष्टीचे शेअरिंग, त्यातून होणारी भावनिक गुंतवणूक आणि एखादया गाफील क्षणात क्षणिक मोहाला बळी पडून एखादी व्यक्ती अलगद सायबर गुन्हयाच्या विळख्यात सापडू शकते. अशा व्यक्तिला योग्य वेळी योग्य मदत, कुटुंबाचा पाठीबा मिळाला नाही तर ती व्यक्ति टोकाचे पाऊल उचलू शकते. सोशल मीडिया एक असे अभासी जग आहे जिथे सर्वच वयोगटातील लोकांचा वावर वाढला आहे. पण अनेकांच्या मनोरंजनाचा भाग असलेला हा सोशल मीडिया विविध सायबर गुन्यांचे मूळ कारण बरत आहे. अभासी वातावरणामध्ये होणाऱ्या गुन्हयांना 'Metacrime' म्हटले जाते. या गुन्हयांमध्ये हकींग, सानबर बुलिइंग, पोर्नोग्राफी, आर्थिक फसवणूक अभासी लैंगिक अत्याचार, अभासी छळ अशा अनेक सायबर गुन्हयांचे कारणच असते. अभासी जगातील असुरक्षित वावर आणि डिजिटल फुटप्रिंटविषयी नसलेली जागरुकता सोशल मीडियावर वावरतांना योग्य ती काळजी न घेतल्याने अनेक जण अशा प्रकारच्या गुन्हयात अडकतांना दिसतात.

**उद्‌देश :**

1) सायबर सुरक्षेवर होणारा सोशल मीडियाचा परिणाम याविषयी माहिती जाणून घेणे.
2) सायबर गुन्हेगारीचे स्वरूप जाणून घेणे.
3) सायबर सुरक्षा म्हणजे काय? याची माहिती जाणून घेणे

**गृहितकृत्ये :**

1) सद्‌य परिस्थितीमध्ये सायबर सुरक्षेवर सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात परिणाम होत आहे.
2) सायबर गुन्हेगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे.
3) अभासी जगातील मैत्रीचे तरुण पिढीवर परिणाम होत आहेत.
4) सोशल मीडिया विविध सायबर गुन्यांचे कारण ठरत आहे.

[1] विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, महिला कला महाविद्‌यालय,बीड

**माहिती संकलन :**

सदरील शोधनिबंधासाठी संशोधन पध्दती  मधील व्दितीयक साधनसामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे. यामको इंटरनेट, विविध ग्रंथांचा समावेश आहे. या स्त्रोताच्या आधारे माहिती संकलन रुन त्यांचा समावेश शोध निबंधामध्ये करण्यात आला आहे.

**सायबर गुन्हेगारी म्हणजे काय?**

सायबर गुन्हेगार म्हणजे अशा व्यक्ति ने सायबरस्पेसमध्ये बेकायदेशीर क्रियाकलपांमध्ये गुंततात. ज्यामध्ये संवेदनशिल माहिती चोरणे आणि संस्थांना हानी पोहोचवणे समाविष्ट आहे. सायबर गुन्हयाची व्याख्या संगणक किंवा इंटरनेट वापरून केलेला कोणताही गुन्हा अशी केली जाते. यामध्ये त्यांच्या कमिशनमध्ये संगणक वापरणारे गुन्हयांचा किंवा इतर काही उद्देशांसाठी संगणकांना लक्ष्य करणारे गुन्हे समाविष्ट असू शकतात.

**सायबर सुरक्षा म्हणजे काय?**

सायबर सुरक्षा म्हणजे इंटरनेटशी जोडलेली प्रणाली, नेटवर्क, सॉफ्टवेअर आणि डेटा यांचे हॅकिंग, चोरी किंवा हानीकारक हल्ल्यांपासून संरक्षण करण्याची प्रक्रिया होय. डिजीटल माहिती, वैयक्तिक खाती, फोटो आणि पैशाची सुरक्षा सुनिश्चित करते. सायबर सुरक्षा हल्ल्याचा धोका कमी करून माहितीची गोपनियता, अखंडता आणि उपलब्धता राखण्यास मदत करते.

युवापिढी रोजचे काही तास लोकप्रिय सोशल मीडियावर, साईटस्वर घालवत असतात. या साईटस् म्हणजे केवळ गप्पा मारण्याचं किंवा फोटो आणि व्हिडीओ शेअर करण्याचं माध्यम नाही. तर अशा आपल्या रोजच्या आयुष्यावर प्रभाव पाडणारं, परिणाम करणारं माध्यम बनले आहे. अगदी आपल्या करिअरवरही त्याचा परिणाम होतो. ट्वीटर,फेसबुक,मायस्पेस यासारख्या ऑनलाईन सोशल नेटवर्किंग साईटसचा आजच्या युवापिढीवर मोठा प्रभाव पडत असल्याचं दिसते. तरुण-तरुणींबरोबरच पौगांडावस्थेतील मुलांच्या आयुष्यावरही सोशल नेटवर्किंग साईट्सचा बराच परिणाम झालेला दिसून येतो. सोशल साईटस्वर वेळ घालवण्याचा सकारत्मक परिणाम आपलया करिअरच्या बाबतीत निर्णय घेताना होऊ शकतो.

**सायबर सुरक्षेवर सोशल मीडियाचा प्रभाव :**

**1) डेटा चोरी आणि गोपनियता :**

वापरकर्ते नकळतपणे आपली वैयक्तिक माहिती जसे की, नाव, जन्मतारीख, पत्ता आणि फोन नंबर सोशल मीडियावर शेअर करतात. ज्याचा वापर सायबर गुन्हेगार, ओळख चोरी आणि फसवणुकीसाठी करतात. सार्वजनिक प्रोफाईलवर जास्त माहिती शेभर केल्याने सायबर गुन्हेगारांना युजर्सचा पाठलाग करणे किंवा पासवर्डचा अंदाज लावणे सोपे होते.

**2) फिशिंग आणि स्कॅम्स :**

सोशल मीडियावर आकर्षक ऑफर्स, बनावट-लिंक्स आणि खोटया प्रोफाईलव्दारे फिशिंग स्कॅम केले जातात. हॅकर्स बनावट संदेश, लिंक किंवा फेक प्रोफाईल वापरून युजर्सना फसवतात आणि त्यांच्या खात्याचा ताबा घेतात.

**3) सायबर गुंडगिरी :**

किशोरवयीन मुलांवर सायबर धमकीचे परिणाम, ज्यामुळे भीती, नैराश्य आणि आत्मविश्वास कमी होणे असे होतात. ज्यामुळे ही मुले दडपणाखली वावरतत. गोंधळलेल्या अवस्थेमध्ये जगतात. तणावामध्ये राहिल्याने त्यांच्यामध्ये नैराश्य येते. नैराश्यामुळे त्यांना कोणत्याच गोष्टीमध्ये रुची रहात नाही. कधी-कधी यामधून बाहेर येता न आल्याने ही मुले टोकाचे पाऊल उचलण्याचीही उदाहरणे समाजामध्ये पहावयास मिळतात.

**4) बनावट प्रोफाईल :**

बनावट प्रोफाईल म्हणजे इतरांच्या नावावर बनावट खाते तयार करून फसवणूक करणे होय. यामुळे सर्वसामान्याच्या मनावर परिणाम होतो, प्रसंगी त्याची समाजातील प्रतिमा मलिन होते. सोशल मीडियावर तुम्ही आपले डिजीटल क्षेत्रातील कौशल्य हायलाईट करून इतरांना सांगू शकता. जेणेकरून इतर प्रांतातील इतर कंपनीतील लोकही तुमची यासाठी निवड करू शकतात. आज कोणत्याही क्षेत्रात काम करायचे असले तरी तुम्ही डिजीटल साक्षर असणे आवश्यक आहे. जेवढे लवकर तुम्ही या जगात प्रवेश कराल तेवढ्या अधिक संधी तुमच्यासाठी उपलब्ध होऊ शकतात. स्वतःला अपडेट करत तुम्ही आपलं करिअर चांगल्या पध्दतीने घडवू शकतात. हे माध्यम दुधारी तलवारीसारख आहे. याचा योग्य वापर केला तर फायदा आहे. अन्यथा त्याच्या आहारी जाऊन नको ती पाऊले उचलली तर आयुष्य समस्याग्रस्त बनायला वेळ लागणार नाही हे वास्तव लक्षात घेतलं पाहिजे.

**सोशल मीडियाचे दुष्परिणाम-**

लहान वयातच हे माध्य हाती आल्याने नको तेवढा वापर केला जातो याचे अनेक दुष्परिणाम होऊ शकतात.

1) सायबर चोरीसारखे गुन्हेगार तयार होणासाठी हे एक माध्यम कारण ठरू शकते.
2) हकिंगसारख्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. यामुळे पैसे मिळविण्याचे अनेक गैरमार्ग मुलांना समजू लागले आहेत ज्याचा विपरित परिणाम होत आहे.
3) अभ्यास करत असतांना सोशल मीडिया साईटस् चेक करत राहण्यामुळे एकाग्रता भंग पावने परिणामी अभ्यासातील लक्ष कमी होते.
4) सोशल मीडियावर मिळणारी ठराविक प्रकारची उत्तरं कोणताही विषय समजून घेण्याची जाणीव नसणे, यामुठे विषाची अभ्यासाकडे तितक्याशा गांभीर्याने पहात नाहीत. सोपे आणि कमी कालावधी असणारे अभ्यासक्रम निवडून करिअर करण्याचा शोर्टकट हे विद्यार्थी निवडतात.

**सुरक्षिततेसाठी उपाय :**

**1) गोपनियता सेटिंग्ज :**

सोशल मीडिया अकाऊंटस् प्रायव्हेट ठेवा. आणि अनोळखी लोकांशी माहिती शेअर करणे टाळले पाहिजे

**2) टू-फॅक्टर ऑर्थोटिकेशन :**

सर्व खात्यांना अधिक सुरक्षेसाठी इ-फक्टर आर्थेटिकेशन वापरणे योग्य ठरते. त्याचा याचा जाणीव पूर्वक वापर करणे गरजेचे आहे.

**3) संशयास्पद लिंक्स :**

अनोळखी लिंकवर क्लिक करणे टाळले पाहिजे. विशेषत: पैशांच्या किंवा लॉटरीच्या माध्यमातून येणारे मेसेज याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करा.

**4) पासवर्ड सुरक्षा :**

मजबुत पासवर्ड वापरा आणि तो वेळोवेळी बदला. असे केल्याने आपली फसवणूक घेण्यापासून संरक्षण मिळते.

**5) लोकेशन सेव :**

सोशल मीडियावर पोस्ट करतांना लोकेशन सेवा बंद ठेवली पाहिजे.

सोशल मीडियाचा वापर करतांना जागरूक रहाणे आणि स्वत:ची डिजीटल ओळख सुरक्षित ठेवणे ही काळाजी गरज आहे.

**सारांश :**

मनोरंजनाचा भाग असलेला हा सोशल मीडिया विविध सायबर गुन्हयांचे मूळ कारण ठरत आहे. अभासी वातावरणामध्ये होणाऱ्या गुन्हयांना ' metacrime' म्हटले जाते. वेगवेगळ्या सायबर गुन्हयांचे कारणच अभासी जगातील असुरक्षित वावर आणि डिजीटल फुटप्रिंटविषयी नसलेली जागरुकता, सोशल मीडियावर वावरतांना योग्य ती काळजी न घेतत्याने अनेकजण अशाप्रकारच्या गुन्हयात अडकताना दिसतात. लहान वयातच हे माध्यम हाती आल्यामुळे नको तेवढा वापर केला जातो. याचे अनेक दुष्परिणाम होतांना दिसतात. सोशल मीडिया हे माध्यम दुधारी तलवारीसारखं आहे याचा योग्य वापर केला तर फायदा आहे अन्यथा त्याच्या आहारी जाऊन नको ती पाऊले उचलली तर आयुष्य समस्याग्रस्त बनायला वेळ लागणार नाही हे वास्तव लक्षात घेतले पाहिजे.

**निष्कर्ष :**

1) सद्यपरिस्थितीमध्ये सायबर सुरक्षेवर सोशल मीडियाचा मोठ्याप्रमाणात परिणाम होत आहे.
2) सायबर गुन्हेगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे.
3) अभासी जगातील मैत्रीचे तरूणपिढीवर परिणाम होत आहेत.
4) सोशल मीडिया विविध सायबर गुन्हयांचे कारण ठरत आहे.

**संदर्भसूची :**

1) दुबे अमित सायबर क्राईम की सच्ची कहानियाँ -प्रभात पब्लिकेशन्स - २०२५.
2) Agarwal Avinash- Toppers Study HACKS - Disha Publication
3) https://mr.wikipedia.org.

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*